## सुट्टीची सूचना

कामगार दिना निमित्त 'पारनेर दर्शन' कार्यालयास बुधवार, दि. १ मे २०२४ रोजी सुट्टी असल्याने दि. २ मे २०२४ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

सर्वांना कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

- संपादक



# पारनेर दर्शन



भारत सरकार मान्यताप्राप्त, हॉलमार्क प्रमाणित दागिण्यांचे दालन.

धरमचंद भवरीलाल™

सराफ ॲण्ड ज्वेलर्स

मेन बाजार पेठ (आडत बाजार), बस स्टँड जवळ, नगर अर्बन को-ऑप.बँकशेजारी, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे.

(02138) 22 45 45 w.w.w.facebook.com/dbjweller



वर्ष १ अंक २०९, बुधवार १ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# तुमची कुंडली काढायला लावू नका!

## ■ केडगांवमध्ये नीलेश लंके यांचा इशारा
## ■ केडगांवकरांच्या मी पाठीशी, लंके यांची ग्वाही

केडगांव : प्रतिनिधी

**आतापर्यंत तुम्हाला पचले असेल. मला तुमची कुंडली काढायला लावू नका. तुम्हाला दहशतीसाठी चार गुंड पाळता येत असतील. वेळ आली तर ते पाय लावून पळून जातील. दुसरीकडे माझ्याकडे असंख्य जिवाभावाचे सहकारी आहेत. पाळणारे गुंड किती पुढे येतात हे मलाही माहिती आहे. माझे सहकारी पळाले ना मी माझ्या बापाचे नाव बदलून ठेवील. असे सांगत आ. नीलेश लंके यांनी केडगांवातील गुंडगिरी हद्दपार करण्याची ग्वाही दिली.**

लोकसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ केडगांव उपनगरात प्रचार फेरी तसेच कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले हाते. त्याप्रसंगी लंके हे बोलत होते.

लंके म्हणाले, आपण ग्रामपंचायत, महानगरपालीका, विधानसभेच्या निवडणूकीत गांभर्याने मतदान करतो. लोकसभेची निवडणूक देशाच्या हितासाठी महत्वाची असते. देशाचे भवितव्य घडविणारी ही निवडणूक असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान वाचविण्याची ही निवडणूक आहे. आज देशाची हुकूमशाहीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. न्यायदेवता म्हणून आपण ज्या संस्थेकडे पाहतो, त्या न्यायसंस्थेला हुकूमशाहीच्या चौकटीत अडकविण्याचा प्रयत्न सुरू आहे. वरीष्ठ पातळीवरून आदेश आल्यानंतर त्याच पध्दतीने न्यायव्यवस्थेकडून निकाल दिला जातो. केंद्रीय एजन्सीचा वापर करून विविध राज्यात सत्तांतर करण्याचा प्रयत्न केला जातो. ईडी, सीबीआयचा वापर करून राजकारण्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केला जातो. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे अतिशय चांगले काम करणारे मुख्यमंत्री त्यांनाही तुरूंगात डांबले जात असल्याचा आरोप लंके यांनी केला.



■ नगर शहरातील केडगांव उपनगरात आ. नीलेश लंके यांची सभा पार पडली.

### केंद्रात, राज्यात दडपशाही

महाराष्ट्रातही अनेक मंत्री, आमदारांना त्रास दिला गेला. अनिल देशमुख, नवाब मलीक यांना तुरूंगात डांबण्यात आले. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर दोषारोपपत्र सिध्द होत नाही असा न्यायालयाने निर्वाळा दिला. सत्ताधाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून झाला की तो पुढारी साधूसंत होतो. केंद्रात दडपशाही सुरू असून राज्यात त्यापेक्षाही दुप्पट पध्दतीने दडपशाही सुरू असल्याचा आरोप लंके यांनी केला.

### जिल्हयात सत्तेचा गैरवापर

नगर जिल्हयात विविध यंत्रणांचा वापर करण्यात येत आहे. पोलीस यंत्रणा, महसूल यंत्रणा, जिल्हा परिषद यांचा गैरवापर करण्यात येत आहे. नगरच्या यश ग्रँड हॉटेलमध्ये मीडियाचे लोक राहत होते. त्यांच्याकडे काहीतरी पन्नास साठ हजार रूपयांची रक्कम सापडली. दबावाखाली सायंकाळी सहा वाजल्यापासून आमच्या कार्यकर्त्यांना पोलीस ठाण्यात नेऊन बसविण्यात आले. सत्तेचा चुकीच्या पध्दतीने वापर करण्यात येत असल्याचे लंके यांनी सांगितले.

### काचेच्या घरात राहता, गाठ माझ्याशी !

आम्ही निवडणूक खेळ म्हणून खेळतो. आमच्या कार्यकर्त्यांना डिवचायला प्रयत्न केला तर गाठ आमच्याशी आहे. काचेच्या घरात राहून आमच्यावर दगड मारण्याचा प्रयत्न करू नका. मागचं पुढचं आम्हाल काढता येईल, आम्ही ते काढतो. ग्रामपंचायत सदस्यापासून आमदारकीपर्यंत व आता खासदारकीपर्यत नीलेश लंके आलेला नाही. तुम्ही रस्त्यावर राहता, मला गमवायचे काही नाही हे लक्षात ठेवा. आमचा नाद करायचा नाही. दहशत निर्माण करू नका. मागचे खासदार बोलले असतील, मी दिलेला शब्द कृतीत आणणारा कार्यकर्ता आहे. माझ्यावर वार केला तर मी सहन करेल परंतू माझ्या कार्यकर्त्यावर वार केला तर नीलेश लंके सहन करणार नाही असा इशारा लंके यांनी दिला.

**डफडेवाले !** निवडणूकीला सामोरे जाताना पाच वर्षात तुम्ही ज्या घोषणा दिल्या त्या अजेंडयावर मते मागणे आपेक्षित आहे. पाच वर्षाच्या काळात काय काम केले हे जनतेपुढे मांडले पाहिजे. मात्र विकासाचा काही मुद्दा राहिलाच नाही. त्यामुळे मतदारसंघात साखर, डाळीचे वाटप करण्यात आले. प्रत्येक भागात चार डफडेवाले ठेवण्यात आले असल्याचा आरोप लंके यांनी केला.

### तुमचे आशिर्वाद घेण्यासाठी मी आलोय

केडगांवकरांचे आशिर्वाद घेण्यासाठी मी इथे आलोय, मला संधी द्या, मी तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. तुम्हाला अभिमान वाटेल असे काम करून दाखवेल अशी ग्वाही आ. लंके यांनी यावेळी दिली.

### प्रशासनाने निवडणूक वेगळया दिशेने नेऊ नये

तुम्ही लोकांना प्रेमाणे जिंका, आमची हरकत नाही. परंतू मतदानासाठी तुम्ही दमदाटी, दादागिरी केली तर सहन केली जाणार नाही. कोण आमच्यासोबत फिरला, कोणी आमचा प्रचार केला तर त्रास दिला गेला जातोय. पोलीस प्रशासनास माझी विनंती असेल ही निवडणूक वेगळया दिशेला नेण्याचा तुम्ही प्रयत्न करू नका. तुमचा कोणी उदे उदो करीत असेल आम्ही तुमच्याकडे पाहणारही नाही. मात्र आमचे कार्यकर्ते रॅलीत सहभागी झाले ?, कोणी आमचे स्टेटस ठेवले त्याला दमदाटी केली तर मी तुमच्या दारात येउन बसेल.

नीलेश लंके, उमेदवार

# एकीकडे पुढारी... दुसरीकडे तुतारी!

पारनेर : नाना करंजुले

**सध्या महाराष्ट्रामध्ये लोकसभा निवडणुकीचे वारे वाहत आहे. उत्तर प्रदेशानंतर सर्वाधिक खासदार या राज्यातून निवडून जातात. त्यामुळे सत्ता सत्तांतराच्या स्पर्धेत महाराष्ट्राला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. या ठिकाणी एकूण ४८ मतदार संघ आहेत. मागील दोन निवडणुकांमध्ये शिवसेना भाजपला येथे कौल मिळाला. मोदी लाटेमध्ये विरोधी पक्ष मात्र या निवडणुकांमध्ये भुईसपाट झाले. यावेळी भारतीय जनता पक्षाने आपकी बार ४०० पार असा नारा दिला आहे. त्या अनुषंगाने पंतप्रधान आणि त्यांच्या पक्षातील इतर नेते विशेष प्रयत्न करीत आहेत.**




उन्हाळ्याच्या या दिवसांमध्ये जसा तापमानाचा पारा वाढत चालला आहे. तसा निवडणुकीचा प्रचार अधिक तापताना दिसत आहे. आपण महाराष्ट्राचा विचार करत असताना २०१४ आणि १९ च्या तुलनेत २०२४ ची ही निवडणूक भाजपला फारशी सोपी जाईल अशी स्थिती नाही. विशेष करून ग्रामीण भागामध्ये वेगवेगळ्या कारणांमुळे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात प्रचंड रोष आहे. ही वस्तुस्थिती भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांना नजरेआड करून चालणार नाही. त्यामुळे यावेळी सत्ताधाऱ्यांनी जो ४५ चा नारा दिला आहे. ही गोष्ट शक्य होईल असे सध्या तरी दिसून येत नाही. ४ जूनला हे सर्व दावे प्रति दावे खरे ठरतील ही फोल हे दिसून येईल. परंतु महाराष्ट्रात एकंदरीत वातावरण पाहता महायुती आणि इंडिया आघाडीला ५०-५० टक्के यश मिळण्याची एकंदरीत चिन्ह आहेत. हा अंदाज असल्याने तो पुढे मागेही होऊ शकतो. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटी नंतर राजकीय समीकरणे बदललेली आहेत.

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना जनतेची सहानुभूती आहे. हे अजित पवार गटाचे तुम्हाला काही शांतता बसून देणार ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी सुद्धा मान्य केले आहे. आणि ती इन कॅश करण्यासाठी महाविकास आघाडी कडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. विशेषता पवारांचा झंजावात जो सुरू आहे. त्यावरून मोठमोठे पुढारी जरी एका बाजूला गेली असली तरी तुतारीची जोरदार हवा असल्याचे स्थानिक पातळीवर आणि विशेष करून ग्रामीण भागात दिसून येत आहे.

अहमदनगर दक्षिण या मतदारसंघांमध्ये फिरत असताना पत्रकार म्हणून वस्तुस्थिती आणि राजकीय वातावरणाचे निरीक्षण केले. प्रामुख्याने हा मतदारसंघ ग्रामीण बहुल आहे. शहरी मतदारांची संख्या तुलनेत कमी आहे. शेती, दुग्ध व्यवसाय, फलोत्पादन या भागांमध्ये होते. कांदा निर्यात, दुधाचे पडलेले दर, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जलसिंचन योजनांचा अभाव, दुष्काळ सदृश्य परिस्थिती त्या अनेक गोष्टींमुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात असंतोष आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये यासाठी किती प्रयत्न केले गेले. तसेच किती प्रश्न मार्गी लागले. याबाबत दस्तूर खुद्द मतदाराच आपल्या प्रतिक्रिया नोंदविता आहेत. त्याचबरोबर शिवसेना व राष्ट्रवादी हे दोन पक्ष ज्या पद्धतीने फुटले गेले. ते सुद्धा अहमदनगर दक्षिण मध्ये असलेल्या बहुतांशी लोकांना रूचले नसल्याचे ग्राउंड रिपोर्ट मध्ये दिसून आले. या भागामध्ये शरद पवार यांचा मोठा प्रभाव असल्याने साहजिकच वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांची उमेद आणि तडफ हा या मतदारसंघांमध्ये कुतुहलाचा विषय बनला आहे. त्यांनी आतापर्यंत नगर, राहुरी, शेवगाव येथे सभा घेतल्या, आणि प्रचंड तापमानातही त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सहाजिकच पवार आणि त्यांच्या पक्षाला एक प्रकारे सहानुभूतीचे वातावरण दिसून येत आहे. त्याचबरोबर या मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार गटाने कोविड योद्धा म्हणून ओळख असणाऱ्या नीलेश लंके यांना निवडणूक रिंगणात उतरवले आहे. सर्वसामान्य आमदार म्हणून लंके यांची प्रचंड मोठ्या प्रमाणात क्रेझ आहे. त्यांची लोकप्रियता अहमदनगर दक्षिण मध्ये राष्ट्रवादी करता जमेची बाजू ठरण्याची शक्यता आहे. दोन वर्षांपूर्वीच त्यांनी या मतदारसंघांमध्ये तयारी सुरू केली. अहिल्यानगर दक्षिण मध्ये प्रत्येक तालुक्यात त्यांनी जम बसवला आहे. कोरोना काळात स्वतः चा जीव धोक्यात घालून केलेले काम. त्याचबरोबर महामार्गासाठी केलेले उपोषण याव्यतिरिक्त के.के रेंज त्याचबरोबर कांद्याला भाव मिळावा यासाठी केलेल्या आंदोलन या व्यतिरिक्त सातत्याने जनमानसामध्ये त्यांचं वावरण, लोकांच्या सुखदु:खामध्ये सहभागी होणे, फोन उचलून संबंधितांना मदतीसाठी धावून जाणे अशा अनेक गोष्टी नीलेश लंके यांच्याकरता प्लस पॉईट ठरत आहेत. वैश्विक संकटामध्ये आम्हालाही नीलेश लंके यांच्यासारखा आमदार हवा आहे अशा प्रकारच्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया समस्त महाराष्ट्रातून येत होत्या. आता नगर दक्षिण मध्ये पुढारी कुठेही जाऊ देत आमचे मत मात्र तुतारी आणि पर्यायाने नीलेश लंके यांना अशा प्रकारच्या सर्वसामान्य जनतेतून उस्फूर्तपणे प्रतिक्रिया येऊ लागलेल्या आहेत. पाथर्डी- शेवगाव पासून ते श्रीगोंदा पर्यंत हे असेच वातावरण का दृष्टिक्षेपास पडत आहेच. त्याचबरोबर जनसामान्यांमधील आवाज सुद्धा ऐकायला मिळत आहे.

प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. सुजय विखे हे तुल्यबळ आहेत. विखे कुटुंबीय अहमदनगर बरोबरच राज्यातील सर्वात मोठे राजकीय घराणे आहेत. त्यांच्या तीन पिढ्या राजकीय क्षेत्रामध्ये वावरत आहेत. दुसरीकडे नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा मुद्दा पुढे केला जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नगर दक्षिण सह राज्यातील इतर ठिकाणी हाय व्होल्टेज लढती पहावयास मिळणार आहेत. असे असले तरी शरद पवार नावाच्या राजकीय शास्त्रज्ञाचा या लोकसभा निवडणुकीतील प्रयोग किती प्रभावी ठरतो हे निवडणूक निकालाच्या दिवशी स्पष्ट होईलच. मात्र एका बाजूला पुढारी आणि दुसऱ्या बाजूला तुतारी अशा प्रकारचे वातावरण आज तरी महाराष्ट्रात दिसून येत आहे. त्यामध्ये नेमके कोण यशस्वी ठरेल याची उत्सुकता लागली आहे.

# फोडाफोडीचे राजकारण जनतेला आवडले नाही

## देशात भाजपा विरोधात लाट : आ.थोरात

संगमनेर :प्रतिनिधी

**'महाराष्ट्रात झालेले फोडाफोडीचे राजकारण जनतेला आवडले नाही. ईडी सीबीआयसह केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर, न्यायव्यवस्थेवरील दबाव सर्वत्र अस्थिरता यामुळे देशात भाजपा विरोधी मोठी लाट आहे. राज्यातील महायुतीचे सरकार जनतेला मान्य नसल्याने महाविकास आघाडीला मोठा पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे राज्यात महाविकास आघाडीला ४० पेक्षा जागा नक्की मिळतील,' असा विश्वास काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.**

शिर्डी लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचारासाठी संगमनेरमध्ये आयोजित सभेत थोरात बोलत होते. थोरात म्हणाले, पंतप्रधानांनी भाषण करताना दहा वर्षात केलेली विकास कामे आणि पुढील पाच वर्षांत करावयाची कामे याचा अहवाल जनतेला दिला पाहिजे. मात्र सध्याचे पंतप्रधान हे धर्माचे राजकारण करत आहेत. देशात केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर केला जात आहे.



न्यायव्यवस्था दबावात आहे. बेरोजगारी आणि महागाई वाढली आहे. मणिपूरमध्ये आदिवासी महिलांवर अत्याचार झाला आहे. देशासाठी ऑलिम्पिक जिंकणाऱ्या महिला खेळाडूंवर अन्याय झाल. मात्र पंतप्रधानांनी त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. सर्वत्र अस्थिरता आणि अनागोंदी आहे. देशाच्या इतिहासात भाजपचा कालखंड हा काळा इतिहास म्हणून लिहिला जाईल. त्यांनी कितीही ४०० पारचे नारे दिले तरी २०० चा आकडाही त्यांना गाठता येणार नाही, असेही थोरात म्हणाले.

**वंचितला मतदान करणे म्हणजे भाजपला मदत करणे**

वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारासंबंधी थोरात म्हणाले, 'वंचितच्या उमेदवार उत्कर्षा रूपवते यांना काँग्रेसने मोठी संधी दिली. आपल्याकडे कायम त्यांचा सन्मान होत होता. राज्यात आणि देशपातळीवरही काम करण्याची संधी होती. शिर्डी मतदारसंघ काँग्रेसला मिळावा यासाठी आपण मोठा प्रयत्न केला. हे सर्वांना माहिती आहे. मात्र रूपवते यांनी काँग्रेस सोडणे हे अत्यंत चुकीचे आणि दु:खदायक आहे. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र या. वंचितला मतदान करणे म्हणजे भाजपला मदत करणे, असे ठरणार असल्याने मतदारांनी विचारपूर्वक निर्णय घ्यावा,' असे आवाहनही त्यांनी केले.

**निष्क्रिय खासदाराचं पार्सल मुंबईला पाठिंबा**

उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे


उर्वरीत पान ३ वर


# कांदा प्रश्नानावर दिंडोरीत लक्ष घाला भारती पवारांनी घेतली भुजबळांची भेट



नाशिक: प्रतिनिधी

**महायुतीच्या जागावाटपात नाशिकचा पेच कायम असताना भाजपच्या दिंडोरी मतदारसंघाच्या उमेदवार आणि केंद्रीय राज्यमंत्री भारती पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली. भुजबळ फार्मवर दोन्ही नेत्यांची भेट घेतली. दिंडोरीत सहकार्य करण्याचं आवाहन पवारांनी भुजबळांना केल्याचं समजतं. नाशिकमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न मोठा आहे. त्यामुळे दिंडोरीत लक्ष घालण्याची विनंती पवारांनी भुजबळांकडे केली.**

गुजरातच्या पांढऱ्या कांद्याला निर्यातीची परवानगी देणाऱ्या केंद्र सरकारने महाराष्ट्रातील लाल कांद्याला


उर्वरीत पान ३ वर



Voted as the Best Education Brand by the Economics Times

ADMISSION OPEN FOR 2024-25

Playgroup to Std. 6

A Proposed CBSE School*



GURUMAULI PODAR LEARN SCHOOL

School Address: SHREE SWAMI SAMARTHNAGAR, JAMGAON ROAD, PARNER, DIST. A.NAGAR.

Office Address : SNEHAL GALAXY, PARNER SUPA ROAD, PARNER

9960265965 / 9765821918 / 9762441030 / 7264838052

Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's

Saint Vivekanand Public School

A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar

PH-9860815843, 9420812001

REQUIRED TEACHERS 2024-2025

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024 10.00 AM to 3.PM at Above Address

Note -

- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education

महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त यू.डायस कोड-27260709504

संस्कार प्रतिष्ठाण राळेगण सिद्धी संचलित

डी.बी.एम. इंग्लिश मेडीयम स्कूल (State Board)

डी.बी.एम. इंटरनॅशनल स्कूल (CBSE Pattern)

यू.डायस कोड-27260709505

राळेगण सिद्धी,ता.पारनेर,जि.अहमदनगर

स्थापना: २००८

"मुले ही राष्ट्राची अनमोल संपत्ती आहे. त्यांना दर्जेदार शिक्षण मिळालेच पाहिजे."- पद्मभूषण डॉ. आण्णासाहेब हजारे

2024-25 साठी प्रवेश सुरू



नर्सरी | एल.के.जी. | यू.के.जी. | १ली ते १०वी

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी समर्पित



आमच्या शाळेची वैशिष्ट्ये

- महाराष्ट्रात नावाजलेल्या शिक्षणपंढरी राळेगण सिद्धीमध्ये दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण.
- शिक्षण कुठेही मिळेल पण सुसंस्कारीत/सर्वांगिण दर्जेदार शिक्षण हवे असल्यास एकवेळ अवश्य विचार करा.
- विद्यार्थ्यांची शैक्षणिक/सामाजिक/ भावनिक/मानसिक/देशभक्ती/बौद्धिक प्रगती न झाल्यास संपूर्ण फी परत.
- खाजगी क्लासची गरज नाही.
- शिरुर व पारनेर शहर व सर्व उपनगरांमधून सुरक्षित स्कूलबस सुविधा उपलब्ध.
- शिरुरपासून फक्त २० मिनिटे अंतरावर. ▸ पारनेरपासून फक्त १५ मिनिटांच्या अंतरावर

7666120168, 9422755191, 7083758198

https://dbmralegansiddhi.blogspot.com

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

# ट्रायल रूममध्ये कॅमेरा?

**ट्रायल रुममध्ये कॅमेरा सापडल्याच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. त्यानंतर महिला, मुलींमध्ये सुरक्षिततेची भीती कायम राहते. ट्रायल रुममध्ये कुणीतरी नजर ठेवून आहे की काय अशी भीती वाटत असल्याचं अनेकींनी सांगितले. काही प्रकरणं उघडकीस आल्यानंतर खडबडून जाग आलेल्या अनेक आऊटलेटच्या व्यवस्थापनांनी कपड्यांच्या ट्रायल रूमची सुरक्षा अपडेट करायला सुरुवात केली आहे. तरीही तिथे येणाऱ्या ग्राहकांना अनेक गोष्टी खटकत आहेत. छत नसलेल्या ट्रायल रूम्सपासून ते त्यांच्या दरवाजांच्या तुटक्या कड्यांबद्दल अनेक तक्रारी ग्राहकांनी तक्रारी मांडल्या. भरमसाठ पैसे देऊनही चोरासारखं इकडे तिकडे चाचपडतच ट्रायल रूम्स वापरायच्या का असा सवाल त्यांनी विचारला.**

ट्रायल रुममध्ये शिरताना सतर्क राहा. बारीक नजरेनं सर्व गोष्टी पाहून, काही संशयास्पद वाटल्यास ते प्रशासनाच्या लक्षात आणून द्या. ट्रायल रुममध्ये शिरताना फोन कॉल करण्याचा प्रयत्न करा. फोन लागला नाही तर रुममध्ये कॅमेरा लपवल्याची शक्यता जास्त आहे. मोबाइलच्या सिग्नलमध्ये कॅमेरात वापरण्यात येणाऱ्या फॅब्रिक वायर्सचा अडथळा येतो त्यामुळे ट्रायल रुममधून फोन लागत नाही. अनेक ठिकाणी ट्रायल रुममध्ये टू वे मिरर सापडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. रुमच्या भितींवरील आरशांमध्ये स्वत:चं प्रतिबिंब दिसत असलं तरी पलिकडच्याला रुममधील व्यक्ती स्पष्टपणे दिसते. ट्रायल रुममधील आरसा टू वे मिरर आहे हे ओळखण्यासाठी आरशाला बोटांनी स्पर्श करा. ज्या ठिकाणी आरशाला स्पर्श केला तिथे जर बोट आणि त्याच्या प्रतिबिंबात अंतर नसेल तर तो टू वे मिरर आहे असं समजावं.

- ट्रायल रुमच्या जागा : बहुतांश ठिकाणी ट्रायल रुमच्या बाजूलाच त्या आऊटलेटची स्टोअर रुम किंवा स्टाफ रूम आहे. त्यामुळे ग्राहक जरा दबकतच ट्रायल रूमचा वापर करताना दिसतात. अशा रुममध्ये टू वे मिरर किंवा पिनहोल कॅमेराच्या मदतीने वॉच ठेवणं सहज शक्य आहे.
- अर्धवट दरवाजे : हाफ डोअर संकल्पनेनुसार वरून आणि खालच्या बाजूला काहीच नसणाऱ्या, फक्त मधला भाग कव्हर करणारे दरवाजे अनेक ग्राहकांना खटकतात. दरवाजांची उंची बऱ्यापैकी असली तरी कोणीतरी डोकावेल याची भीती सतत मनात असल्याचं महिला ग्राहकांनी सांगितलं.




- तुटक्या कड्या : आधीच हँगिग डोअर्स असणाऱ्या ट्रायल रुममध्ये दरवाजांच्या कड्या न लागणं, कड्या जॅम झालेल्या असणं, बिजागऱ्यांजवळ जास्त फट असणं असं चित्र दिसून येत होतं. दरवाजांच्या या अशा परिस्थितीमुळे बिचकतच कपडे घालून बघितले जातात.
- कॉमन चेंजिंग रुम : काही आऊटलेटमध्ये आजही स्त्री आणि पुरुषांसाठी वेगळ्या ट्रायल रुम्स नाहीत. कॉमन ट्रायल रुममध्ये महिलांना सर्वाधिक असुरक्षित वाटतं.

### ओपन ट्रायल रुमचा धोका

**बहुतांश मॉल्समध्ये वरुन छत नसणाऱ्या ट्रायल रुम्स आहेत. त्यामुळे या ओपन ट्रायल रुममध्ये वरून शूटिंग होण्याची शक्यता जास्त असते. ट्रायल रुम बाहेर लावलेल्या सिलींग लाइट्सच्या नावाखील कॅमेराच्या माध्यमातून ग्राहकांवर वॉच ठेवला जाण्याची भीती असते.**

# बॅकअप घ्यायचा?

**तंत्रज्ञान विश्वात ज्याचं कोणी नाही त्याचं गुगल असतं, अशी नवी म्हण तयार झालीय. अर्थात कुठे काहीही अडलं तरी गुगलवर शोध घेतल्याशिवाय पाऊल पुढे जात नाही. या स्मार्ट जगात उपकरणांचा वापर करत असताना आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर माहिती जमा होते. पण आपलं उपकरण हरवलं किंवा चोरीला गेलं तर माहिती कशी मिळेल? असा प्रश्न अनेकांना पडतो. यावरही गुगलकडे उत्तर आहे, ते बॅकअप आणि सिंकचं! पाहूयात आपल्याला कशापद्धतीनं माहितीचा बॅकअप घेता येऊ शकतो...**



तंत्रस्नेही व्यक्तीच्या फोनवर एका मिनिटाला किमान दहा केबीची माहिती जमा होत असते, असं एका पाहणीतून समोर आलंय. ही माहिती ठेवायची कुठे हा प्रश्न त्यांच्याकडे असतो. अनेकदा ते ड्राइव्ह किंवा बाह्य हार्डडिस्कसारख्या पर्यायांचा वापर करतात. मात्र त्यातही त्यांना प्रत्येकाचा वेगळा लॉगइन आयडी आणि पासवर्ड लक्षात ठेवावा लागतो. पण या सर्व गोष्टी एकाच ठिकाणी साठवणं शक्य आहे. तेही अगदी सोप्या पद्धतीनं करणं शक्य झालंय. कारण गुगलनं नुकतंच बॅकअप आणि सिंक ॲप बाजारात आणलंय. यात तुम्हाला तुमच्या महत्त्वाच्या फाइल्सचा बॅकअप आपोआप घेता येऊ शकतो. यामुळे तुमचं कोणतंही उपकरण हरवलं किंवा अचानक बंद पडलं तरी तुम्ही तुमची माहिती मिळवू शकता. हे कशापद्धतीनं करता येईल ते पाहूयात...

### बॅकअप कसा घ्याल...

तुमच्या लॅपटॉप किंवा संगणका मधील कोणत्या फाइल्सचा बॅक अप घ्यायचा आहे तर त्या फाइल्स निवडा. यात तुम्हाला संपूर्ण फोल्डर निवडण्याचीही मुभा देण्यात आली आहे. यापूर्वी ई- मेलला फोल्डर जोडायचं असल्यास ते झिप करून जोडावं लागत होतं. पण या ॲपमध्ये एक- एक फाइल अथवा फोल्डर निवडण्याची मुभा देण्यात आली आहे. हे झाल्यावर तुमच्या डेस्कटॉपवरील तसंच डॉक्युमेंट फोल्डर तसंच माय पिक्चर फोल्डरमधील फाइल्स आपोआप निवडल्या जातील. यात तुम्हाला ज्या फाइल्सचा बॅकअप घ्यायचा नाही त्या फाइल्स डीसिलेक्ट करा.

### साइन इन करा

तुमच्या जीमेलच्या ई-मेल आयडीनं ॲपमध्ये लॉगइन करा. हे लॉगइन केल्यानंतर तुमच्या उपकरणामध्ये गुगल बॅकअप आणि सिंक ॲपचं लॉन्चर आपोआप लोड होतं. ते लोड झाल्यावर तुम्ही गेट स्टार्टेड हा पर्याय निवडा. यानंतर तुम्हाला तुम्ही तुमच्या गुगल ड्राइव्हला ज्या खात्याने जोडलं आहे त्या खात्यानं लॉगइन करावं लागतं. जर तुम्ही यापूर्वी गुगल ड्राइव्ह वापरलं नसेल तर तुमच्या जीमेलच्या ई- मेल आयडीनं तुम्ही लॉगइन करू शकता.

### छायाचित्रांचा दर्जा

या ॲपमध्ये तुम्हाला तुमचं छायाचित्र उच्च दर्जाचं अथवा मूळ छायाचित्र ज्या आकाराचं आहे त्या आकाराचं सेव्ह करण्याची सुविधा देण्यात आलीय. पण आपल्याला जास्तीत जास्त माहिती साठवायची असेल तर तुम्ही छायाचित्र मूळ आकारामध्येच सेव्ह करणं फायदेशीर ठरेल. या ॲपमध्ये आपल्याला २५ जीबीपर्यंतची माहिती मोफत साठवता येऊ शकते. यानंतर तुम्हाला जागा पाहिजे असल्यास ॲपमध्ये विविध पॅकेजेस देण्यात आली आहेत. यासाठी तुम्हाला वार्षिक वर्गणी द्यावी लागते. यात अमर्याद साठवणूक क्षमतेचा पर्यायही उपलब्ध आहे. ज्यांच्याकडे गुगल पिक्सेल हा फोन आहे, त्यांना अमर्याद साठवणूक क्षमता मोफत मिळते. यामुळे तुमच्या पॅकेजनुसार तुम्ही माहिती साठवणूकीचं नियोजन करावं. या सर्वाचा बॅकअप तुम्ही गुगल ड्राइव्हमध्येही घेऊ शकता.

### बॅकअप अँड सिंक ॲप डाऊनलोड करा

गुगलच्या बॅकअप आणि सिंक पानावर जा. तिथं डाऊनलोड बॅकअप अँड सिंक असा पर्याय असेल तो निवडा. जर ते आपोआप डाऊनलोड झालं नाही तर त्याच वेबपानावर आणखी एक लिंक दिसेल त्यावर क्लिक केल्यावर तुम्ही मॅन्युअली डाऊनलोड करू शकता. एकदा का तुम्ही ॲपच्या सर्व परवानग्या मान्य केल्या की अवघ्या काही मिनिटांमध्ये ते ॲप डाऊनलाड होतं. हे ॲप डाऊनलोड झाल्यावर इंस्टॉल होण्यापूर्वी पुन्हा एकदा तुमची परवानगी मागितली जाते. ती परवानगी दिली की ॲप तुमच्या उपकरणात इन्स्टॉल होतं.

### ▸ डेस्कटॉपवर सिंक फोल्डर तयार करा

डेस्कटॉपवर सिंक फोल्डर तयार करण्यासाठी तुम्ही स्टार्ट बटनचा पर्याय निवडा. यानंतर तुमच्या डेस्कटॉपवर गुगल ड्राइव्हचा नवीन फोल्डर तयार होईल. यात तुम्ही गुगल ड्राइव्हवर सध्या साठवून ठेवलेली माहिती एकत्रित मिळते. तुम्हाला जर तुमचे सर्व छायाचित्र गुगल ड्राइव्हवर साठवून ठेवायचे असतील तर तुम्ही ते साठवून ठेवताना गुगल ड्राइव्हचा पर्याय निवडा. म्हणजे तुम्ही संगणकात अथवा लॅपटॉपमध्ये सेव्ह करत असलेले छायाचित्र आपोआप ड्राइव्हवर सेव्ह होत जातील. यामुळे बॅकअप घेण्याचा तुमचा त्रासही वाचेल.



# मोबाइल ओला झाला?



**खरं तर मोबाइल ओला होण्यासाठी कुठला एक विशिष्ट मौसम असतो असं नाही. अगदी आंघोळ करताना बादलीत पडून एक डुबकी घेणं कधीही शक्य असतं. पण मुद्दा हा आहे की मोबाइल पाण्यात पडला, ओला झाला की करायचा तरी काय? पाच रुपयाचं प्लास्टिकचं कव्हर आणि त्यात दडवलेला मोबाइल अनेकांच्या खिशातून डोकावत असतो. पण ही झाली सावधगिरीची उपाययोजना. ओला फोन घसा कोरडा करतो हेच खरं. पण मुळात फोन ओला झाल्यानंतर काय करावं यापेक्षा काय करू नये हे माहीत असणं महत्त्वाचं आहे...**

### हे करू शकता...

- शक्य तितक्या तातडीने फोन स्वीच ऑफ करा. स्वीच ऑन असलेल्या फोनमध्ये पाणी गेल्याने शॉर्टसर्किटची शक्यता जास्त असते.
- कव्हरमधून फोन बाहेर काढा. तसंच सीमकार्ड, स्मार्टकार्डसुद्धा फोनपासून वेगळं करा.
- फोनमधून बॅटरीसुद्धा वेगळी बाहेर काढा. सगळ्याच फोनमध्ये ही सुविधा असेल असं नाही. हल्लीच्या अनेक स्मार्टफोन्समधून बॅटरी वेगळी काढता येत नाही. तशी ती होत नसेल तरी विनाकारण प्रयत्न करू नका.
- एखाद्या स्वच्छ कापडाने किंवा पेपर टॉवेलने मोबाइल शक्य तितका सुकवायचा प्रयत्न करा. टेबल किंवा फरशी पुसल्यासारखं मोबाइल पुसू नका. कापड ठेवून पाणी शोषून घ्या.
- जर का पाणी खूप आतपर्यंत गेलं असेल तर व्हॅक्युम क्लिनरचा वापर करू शकता. मात्र हा उपाय करण्याआधी सिमकार्ड, मेमरीकार्ड, बॅटरी फोनपासून वेगळं करा. फोनच्या छोट्या छोट्या खाचाखुचांमध्ये शिरलेलं पाणी व्हॅक्युम क्लिनरच्या साहाय्याने शोषून घेणं शक्य असतं. पण हे करताना काळजी घ्या.
- फोन सुकवण्याचा सर्वात सोपा, किफायतशीर आणि स्वस्त उपाय म्हणजे तांदूळ. एक हवाबंद किंवा सीलबंद प्लास्टिकच्या पिशवीत तांदूळ भरायचा आणि त्यामध्ये फोन ठेवून द्यायचा. तांदळामध्ये पाणी आणि बाष्प शोषून घेण्याचा गुणधर्म आहे. त्यामुळे फोन संपूर्णपणे कोरडा होऊ शकतो. पण तो सुरू होईल की नाही हे मात्र तो किती ओला झाला आहे यावरच अवलंबून आहे. अनेकदा पाण्यामुळे शॉर्टसर्किट होतं किंवा पाण्यातल्या मिनरल्समुळे इलेक्ट्रॉनिक्स खराब होऊ शकतात.
- निदान दोन-तीन दिवस तरी फोन कोरडा होण्यासाठी वाट पाहा. फोन सुरू करून बघण्याचा कितीही मोह झाला तरी टाळा. दोन- तीन दिवसांनंतर फोन बाहेर काढा. त्यामध्ये बॅटरी, सिमकार्ड, मेमरीकार्ड घाला आणि स्वीच ऑन करा.

फोन सुरू झाला नाही तर चार्जिंगला लावा. जर का चार्ज होत नसेल तर बॅटरी खराब

### चार्ज होतोय का पहा...

झाल्याची शक्यता आहे. बॅटरी बदलून पाहा किंवा फोन सरळ रिपेअरिंगसाठी द्या. फोन व्यवस्थित सुरू झाला तरी पुढील काही दिवस त्याच्या फंक्शनिंगकडे नीट लक्ष द्या. गाणी लावून बघा, व्हिडीओ नीट दिसतायंत का ते पाहा, टचस्क्रीनचं कामकाज व्यवस्थित सुरू आहे त्याकडे लक्ष द्या.अनेकदा काही दिवसांनंतर फोनमधील प्रॉब्लेम समोर यायला लागतात. या सर्व उपायांसोबतच आणखी एक उपाय नेहमी सांगितला जातो तो म्हणजे फोन अल्कोहोलमध्ये बुडवून काढा. पण हा उपाय बराच धोकादायक आहे. एक तर शुद्ध अल्कोहोल हे ज्वालाग्रही आहे आणि ते खूप काळजीपूर्वक हाताळावं लागतं. फोन भिजला तर हे सगळे उपाय आहेत. पण तो भिजू नये याची काळजी घेणं कधीही चांगलं नाही का? प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर हेच खरं.

### काय टाळाल?

फोन ऑन करू नका. कुठलीही की किंवा बटन दाबू नका. फोन स्वीच ऑफ करायचा असेल तर ठीक आहे. फोनवर टॅप करू नका किंवा तो जोरजोरात हलवू नका. अगदी नेहमी होणारी चूक म्हणजे फोन उघडणं. कुठल्याही स्मार्टफोनमध्ये लिक्विड डॅमेज इंडिकेटर असतो. फोन उघडला की हा इंडिकेटर ॲक्टिव्हेट होतो. काही स्मार्टफोन्समध्ये असे इंडिकेटर्स असतात जे भिजल्यावर रंग बदलतात. उदा. एखादा छोटा स्टीकर. या इंडिकेटर्सवरून मॅन्युफॅक्चर्सना फोन नेमका कशामुळे बिघडला हे कळतं. फारच गरज असेल आणि अनुभव असेल तर मोबाइल उघडा, अन्यथा तसा कुठलाही प्रयत्न करू नका. ओला झाला म्हणून फुंकर मारू नका. त्यामुळे पाणी स्मार्टफोनच्या आणखी आत जाण्याची शक्यता असते. फोन ओला झाला की ड्रायरने ब्लो केल्याने किंवा मायक्रोवेव्हमध्ये ठेवल्याने तो नीट होतो असा एक समज आहे. पण त्याने स्मार्टफोन खराब होण्याचीच शक्यता जास्त असते. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे फोनमध्ये शॉर्टसर्किट होऊन तो फुटण्याची शक्यता असते. फोन ओला झाल्यानंतर काय टाळावं याची ही यादी झाली. पण मग नेमकं करायचं तरी काय.

# प्रोजेक्टर घ्यायचा? या टिप्स घ्या लक्षात

**आजकाल अनेक घरांमध्ये होम थिएटर सर्रास दिसू लागलंय. काही वर्षांपूर्वी नवा असणारा हा प्रकार आता बऱ्यापैकी रुळलाय असं म्हणायला हरकत नाही. मोठ्या आकाराचा म्हणजे अगदी भिंतीभर पसरलेला मल्टिपर्पज टीव्ही, चार कोपऱ्यांमध्ये लावण्यासाठी स्पीकर्स, वूफर्स असा फौजफाटा असला की घरच्या घरी थिएटरचा अनुभव घेणं सहज शक्य. पण समजा असा भिंतीभर आकाराचा टीव्ही बजेटमध्ये बसत नसेल तर काय करणार? एक सोपा आणि किफायतशीर उपाय म्हणजे सरळ प्रोजेक्टर आणायचा आणि पांढऱ्या मोठ्या पडद्यावर (अथवा थेट भिंतीवरच) सिनेमा, मॅचेस बघायच्या. वर्ल्डकपचा फिव्हर बघता सध्या सोसायट्यांमध्ये, मैदानांमध्ये, हॉटेल्स- रेस्टॉरंट्समध्ये हे प्रोजेक्टर आणि स्क्रीन्स हमखास बघायला मिळतात. खरं तर या प्रोजेक्टर्सचे प्रामुख्याने तीन प्रकार आहेत. त्यामुळे आपल्या गरजेप्रमाणे नेमका कुठला प्रोजेक्टर कसा घ्यायचा हे अनेकदा अवघड होऊन जातं. किमतींचं म्हणाल तर अगदी अडीचशे रुपयांपासून ते थेट ५० हजारांपर्यंत अशी या प्रोजेक्टर्सची रेंज असते. त्यामुळे हे प्रकरण नक्की कसं काय असतं आणि त्यातले खाचखळगे काय हे कळणं महत्त्वाचं असतं...**

- होम थिएटर प्रोजेक्टर्स... : एखादी इमेज ५० इंची एचडीटीव्हीच्या ३६ पटीने मोठी प्रोजेक्ट करण्याची ताकद होम थिएटर प्रोजेक्टर्समध्ये असते. त्यामुळेच एखादा ॲक्शनपट असो किंवा फुटबॉल, क्रिकेटचे रंगतदार सामने. या प्रोजेक्टर्समुळे एक तगडा अनुभव मिळतो. होम थिएटर्स प्रोजेक्टर्स हे मुळातच थिएटरसारख्या वातावरणासाठी बनवलेले असतात. त्यामुळे खोलीत थिएटरसारखा अंधार असणं अनिवार्यच. अर्थात अंधार नसला तरी ब्राइटनेस वाढवून सिनेमाचा दर्जा टिकवता येतो.
- होम थिएटर्स कशासाठी उपयुक्त ठरतात? : मूव्ही नाइट्स, मूव्ही मॅरेथॉनसाठी होम थिएटर्स उपयुक्त ठरतात. सिनेमांचे चाहते असाल आणि थिएटरसारखा अनुभव हवा असेल तर हे प्रोजेक्टर्स उत्तम. थ्रीडी सिनेमे, स्पोर्ट्स, व्हिडीओ गेम्स, फोटो स्लाइड शो यांच्यासाठी होम थिएटर प्रोजेक्टर्सचीच शिफारस केली जाते. मोठ्या स्क्रीनवरही इमेजचा दर्जा टिकवला जात असल्याने हे प्रोजेक्टर्स लोकप्रिय आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रोजेक्टर्सच्या फॅनचा आवाज फार कमी येतो. त्यामुळे कानात वाजणारा जो एक सततचा आवाज असतो तो या प्रोजेक्टर्समधून येत नाही. साधारण सहा हजारांपासून या प्रोजेक्टर्सची किंमत सुरू होते.



- पिको प्रोजेक्टर : पिको प्रोजेक्टर हा प्रकार एकदम हिट आहे. अत्यंत कॉम्पॅक्ट आणि बॅग किंवा पर्समध्ये सहज मावू शकेल इतका लहान पण तितकाच पॉवरफुल असा हा प्रोजेक्टर. हातात पकडण्याइतके हे पॉकेट साइज प्रोजेक्टर्स छोट्या आकाराच्या खोल्यांमध्ये उत्कृष्ट काम करू शकतात. दीड किलोपेक्षा कमी वजन असल्यामुळे एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणं सोपं असतं. ऑफ साइट मीटिंग्ज किंवा प्रवासामध्येही या प्रोजेक्टर्सचा वापर करणं शक्य आहे. प्रोजेक्टर्समधले सर्वात लहान आकाराचे असे हे प्रोजेक्टर्स आहेत. बल्बचं लाइफही चांगलं असल्याने हे प्रोजेक्टर्स त्रासदायक अजिबात नाहीत.
- प्रोजेक्टर्स घेताना काय बघायचं? : प्रोजेक्टर टेक्नॉलॉजीमध्ये स्टँडर्ड लॅम्प, एलईडी आणि लेझर असे तीन प्रकार आहेत. स्टँडर्ड लॅम्प प्रोजेक्टर्समधला बल्ब साधारण पाच हजार तास चालू शकतो आणि हा सर्वात किफायतशीर पर्याय आहे. लेझर प्रोजेक्टर्स हे ऊर्जा वाचवणारे प्रोजेक्टर्स आहेत. तसंच यामध्ये बल्बची रिप्लेसमेंट हा प्रकार नसतो आणि लाइट सोर्सपेक्षा हे ब्राइट असतात. एलईडी हे प्रामुख्याने पिको प्रोजेक्टर्समध्ये वापरले जातात. यातल्या बल्बचं आयुष्य हे साधारण २० हजार तास इतकं असतं.

### बिझनेस प्रोजेक्टर्स

मीटिंग्ज, प्रेझेंटेशन्स इतकंच नाही तर क्लासरूम्समधील वापरासाठी बिझनेस प्रोजेक्टर्स किफायतशीर ठरतात. त्यांना मल्टिमीडिया किंवा डेटा प्रोजेक्टर असं सुद्धा म्हटलं जातं. याचं कारण म्हणजे होम थिएटर प्रोजेक्टर्सपेक्षा ते वरचढ असतात. सामान्यत: मीटिंग रूम्स किंवा क्लासरूम्समध्ये अंधार नसतो. त्यामुळे प्रकाशातही व्यवस्थित काम करू शकणारे आणि दर्जात्मक इमेजेस दाखवणारे प्रोजेक्टर्स गरजेचे असतात. अंधार नसला तरीही या प्रोजेक्टर्सचा ब्राइटनेस उत्तम असतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे बिझनेस प्रोजेक्टर्स हे ग्राफ्स, पॉवर




पॉइंट स्लाइड्स, फोटो अशी स्थिरचित्र (स्टॅटिक इमेजेस) दाखवण्याच्या उद्देशानेच तयार करण्यात आले आहेत. अर्थात मल्टिमीडिया आणि एंटरटेन्मेंटसाठीही त्याचा वापर केला जाऊ शकतो. लॅपटॉप, ब्लू-रे प्लेयर तसंच इतर डिव्हाइसेसना जोडण्यासाठी एचडीएमआय पोर्टची सुविधा या प्रोजेक्टर्समध्ये असते. त्यामुळे बिझनेस मीटिंग्ज, प्रेझेंटेशन्स, कॉन्फरन्सेस, पॉवर पॉइंट स्लाइड शो इतकंच नाही तर शैक्षणिक आणि प्रशिक्षणात्मक कामांसाठीही हा प्रोजेक्टर उत्तम आहे. लख्ख प्रकाश असणाऱ्या जागेत उत्तम ब्राइटनेस तर हे देतातच, पण यांची खासियत म्हणजे ते पोर्टेबल असतात. वजनाने हलके आणि हाताळायला सोपे असल्याने एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणं सहज शक्य असतं. सामान्यत: प्रोजेक्टर्स सेटअप करणं म्हणजे डोक्याला ताप समजला जातो (तसा तो नसतो.) पण हे प्रोजेक्टर्स इन्स्टॉल करणं सोपं असतं (मॅन्युअल वाचून सेट अप करणं सहज शक्य आहे.) या प्रोजेक्टर्सना मल्टिपल इनपुट्स देता येतात. त्यामुळे एकाच वेळी लॅपटॉप आणि इतर डिव्हाइसेसही जोडता येतात. याशिवाय वायरलेस प्रोजेक्शनची सुविधाही यात उपलब्ध असते. किमत म्हणाल तर सहा ते सात हजारांपासून यांची किंमत सुरू होते. सामान्यत: सहा महिने ते एक वर्ष इतकी वॉरंटी असते.

## शॉर्ट न्यूज

### वाघचौरे यांना विजयी करा : थोरात

■ **शिर्डी :** लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांचा सोमवारी सायंकाळी प्रचार नारळ शुभारंभ काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत खांडगाव येथील खांडेश्वर मंदिराच्या प्रांगणात संपन्न झाली. यावेळी आमदार थोरात यांनी कार्यकर्त्यांसोबत संवाद साधून उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांना विजयी करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी व्यासपीठावर उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दादासाहेब मुंडे, नांदेडचे प्रा. यशपाल भिंगे सहित पदाधिकारी उपस्थित होते.

### राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत लोणीच्या खेळाडूंचा डंका

■ **लोणी प्रवरा :** राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत डी के स्पोर्ट्स क्लब लोणीच्या अपेक्षा हसनाळे, साईशा विखे, ईशा लेकुरवाळे या रायफल शूटिंग खेळाडूंची पश्चिम भारतीय विभागीय स्पर्धेत निवड झाली. राज्यस्तरीय महाराष्ट्र हवाई आणि अग्निशास्त्र स्पर्धा छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे संपन्न झाली. या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये डी के स्पोर्ट्स क्लब नेमबाजी प्रशिक्षण केंद्र लोणी येथील नेमबाज खेळाडू साईशा विखे हिने ४०० पैकी ३६४ गुण प्राप्त केले, अपेक्षा हसनाळे हिने ४०० पैकी ३८१ गुण प्राप्त केले.

### डेपोच्या नावाखाली रात्रंदिवस वाळू वाहतूक सुरु

■ **राहुरी :** सामान्य नागरिकांना अल्प दरात वाळू मिळावी, वाळू चोरीवर आळा बसवा. या हेतूने शासनाने वाळू लिलावाचे शासकीय डेपोला परवानगी दिली. राहुरी तालूक्यातील डिग्रस येथे वाळू डेपो चालवीणारे ठेकेदार शासकीय डेपोच्या नावाखाली डिग्रस येथे रात्रंदिवस वाळू उपसा करून बेकायदेशीर रित्या वाळू वाहतूक सुरु आहे. स्थानिक नागरिकांनी वाळू वाहतूक करणारे दोन ढंपर पकडून महसूल कर्मचाऱ्यांच्या ताब्यात दिले. डिग्रस येथील वाळू डेपोची सखोल चौकशी करून कारवाई करावी. अन्यथा तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आरपीआयच्या सिमा बोरुडे यांनी दिला.

### बिबट्याचा शेतकऱ्यावर हल्ला

■ **संगमनेर :** तालुक्यातील जांबुत खुर्द येथील शिवाजी बबन पारधी नामक शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला करीत त्यांना गंभीर जखमी केले. रविवारी सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली. त्यामुळे परिसरात भीतीदायक वातावरण पसरले आहे. शिवाजी पारधी सायंकाळच्या सुमारास शेतातील पिकाला पाणी भरण्यासाठी गेले असता दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर हल्ला करून जखमी केले. या हल्ल्यात त्यांच्या खांद्याला, छाती, पोटाला आणि डोक्याला गंभीर जखमा झाल्या. पारधी यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्यानं धूम ठोकली.

### श्रीरामपुरात सव्वा लाखाची रक्कम जप्त

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील टाकळीभान येथे निवडणूक भरारी पथकाने १ लाख १९ हजार रुपयांची रक्कम हस्तगत केली आहे. शिर्डी लोकसभा निवडणुकीसाठी दिनकर सचिन सुरेश यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत पथकाने ही कारवाई केली आहे. नियमित तपासणी करत असताना नेवासे श्रीरामपूर रस्त्यावर नेवासेकडून श्रीरामपूरकडे येणाऱ्या वाहनांची तपासणी करत असताना एका चारचाकी वाहनातून ही रक्कम हस्तगत करण्यात आली. शिर्डी लोकसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात आधुनिक शेतीचा मार्ग सुकर - खा.डॉ.सुजय विखे पाटील

**नगर : प्रतिनिधी**

**मागील १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी विकासाच्या दृष्टीने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाचा लाभ शेतकऱ्यांना झाला आहे. पारंपरिक शेतीला प्राधान्य देऊन केंद्र सरकारने कृषी क्षेत्रातील आधुनिक शेतीचा मार्ग सुकर केला आहे, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.**



चिंचोडी पाटील येथील महायुतीच्या सभेत बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना सक्षम बनवण्याच्या महत्त्वाकांक्षेसह शेती क्षेत्रातील परिवर्तनाला गती देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, त्यांना आणि त्यांचे प्रयत्न सुरक्षित करणे, त्यांना तंत्रज्ञानाचे जाणकार बनवणे, कृषी संशोधन आणि शिक्षणाला चालना देणे आणि शेतीशी संबंधित पायाभूत सुविधा निर्माण करणे ही काही प्रमुख उद्दिष्टे आहेत. कृषी क्षेत्राच्या वाढीसाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काम केले जात आहे.''

यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले, भाजप तालुकाध्यक्ष अशोक कार्ले, राष्टवादीचे तालुकाध्यक्ष अशोक कोकाटे, मार्केट समितीचे माजी संचालक हरिभाऊ कर्डिले, शिवसेना तालुकाध्यक्ष अजित दळवी, युवा सेना अध्यक्ष सचिन ठोंबरे आदी उपस्थित होते.

''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साकारलेला न्यू इंडिया हा त्यांच्या सबका साथ, सबका विकास या ब्रीद वाक्यावर चालतो आणि शेतकरी कल्याण हा त्याचा अविभाज्य भाग आहे. कोणत्याही परिवर्तनाचा प्रारंभिक जोर हा जागरूकतेतून येतो आणि ते काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. या संदर्भात, लॅब-टू-लँड, हर खेत को पानी आणि पर ड्रॉप मोअर क्रॉप यांसारख्या संदेशांच्या सरकारच्या प्रेरणादायी योजनांनी शेतीची उत्पादकता वाढली आहे.

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय सरकारी योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील आहे. हे काम जलद गतीने होत आहे आपल्यासारख्या राष्ट्राची, जिथे जवळपास निम्मी कामगार शक्ती शेतीमध्ये गुंतलेली आहे, शेती शाश्वत केल्याशिवाय भरभराट होऊ शकत नाही. यामुळे तंत्रज्ञानापासून पीक विम्यापर्यंत, सुलभ कर्ज उपलब्धतेपासून ते आधुनिक सिंचन पद्धतींपर्यंत, संपूर्ण शेती चक्रामध्ये शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी सर्वसमावेशक कृती योजना राबवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे काम सुरू केले आहे.''

# वैभवशाली ऐतिहासिक श्रीगोंदा पुस्तकाचे प्रकाशन

## मान्यवरांची उपस्थिती ; पुरातन इतिहास उलगडणार

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**वैभवशाली ऐतिहासिक श्रीगोंदा' या पुस्तकाच्या रूपाने श्रीगोंद्याचा इतिहास उजेडात आला आहे. श्रीगोंद्यातील सरदार महादजी शिंदे यांचा वाडा जतन करण्यासाठी पुढाकार घ्यावा. कोट्यवधी रुपये खर्च केले तरी ही वास्तू पुन्हा उभी राहणार नाही. त्यासाठी हा वाडा आताच वाचवावा लागेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी केले.**




पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या पोतदार सभागृहात राजेश इंगळे लिखित 'वैभवशाली ऐतिहासिक श्रीगोंदा' या ऐतिहासिक संदर्भ पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला, यावेळी ते बोलत होते. प्रमुख मान्यवर म्हणून पुरातत्व अभ्यासक सचिन पाटील, वीरगळ आणि शिलालेख अभ्यासक अनिल दुधाणे, पानिपतवीर जानराव वाबळे यांचे वंशज नितीन वाबळे, 'आयसर' वैज्ञानिक संस्थेचे शास्त्रज्ञ अशोक रुपनेर, ज्येष्ठ इतिहास लेखक सुरेश शिंदे, बारव अभ्यासक प्रमोद काळे, मनोज सिनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

श्रीगोंदा येथील प्राथमिक शिक्षक व शिवदुर्गचे संस्थापक राजेश इंगळे 'किल्ले दाखवणारा माणूस' म्हणून महाराष्ट्रात ओळखले जातात. त्यांनी श्रीगोंदा तालुक्यातील ऐतिहासिक वारसा संकलित करून या पुस्तकाद्वारे शब्दबद्ध केला आहे. पुरातत्व अभ्यासक सचिन पाटील यांनी आदिमानवापासून ब्रिटिश कालखंडापर्यंतचा श्रीगोंदेतील पुरातन वारसा उलगडून सांगितला. यावेळी वीरगळ अभ्यासक अनिल दुधाणे यांचा 'वीरगळ विरश्री' म्हणून गौरव करण्यात आला.

या सोहळ्यास नगर जिल्हा शिक्षक बँकेचे माजी चेअरमन डॉ. संदीप मोटे, संदिप होले, गोवर्धन दरेकर, बाळासाहेब काकडे, विजय उंडे, खंडेराव जठार, प्रमोद कुलकर्णी, विठ्ठल ढाणे, अजित दळवी, मिठू लंके, अक्षय गायकवाड, संकेत लगड, विजय गायकवाड, गोरख नलगे, तुषार चौधरी, अमोल बडे, सचिन भोसले, सागर शिंदे, यांसह नगर, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील शिवदुर्गचे शिलेदार बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव सोमेश शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. भरत खोमणे व प्रांजल कुलकर्णी तर आभार मारूती वागस्कर यांनी मानले.

(पान १ वरून)

### फोडाफोडीचे राजकारण जनतेला आवडले नाही

म्हणाले, 'शिर्डी लोकसभा मतदारसंघाला मागील दहा वर्षात निष्क्रिय खासदार लाभला. हे मुंबईचे पार्सल परत पाठवा. समोरच्यांच्या कोणत्याही आमिषाला बळी पडू नका. पुढील पाच वर्षांत तुमच्या प्रत्येकाच्या सेवेसाठी मी सदैव तत्पर असेल,' असेही वाकचौरे म्हणाले.

महागाईमुळे मंगळसूत्र विकण्याची वेळ

डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या, 'दोन कोटी नोकऱ्या देण्याचा दावा करणाऱ्या भाजप सरकारने देशांमध्ये मोठी बेरोजगारी निर्माण केली आहे. गांधी परिवाराचा देशासाठी मोठा त्याग आहे. महागाईमुळे महिलांना मंगळसूत्र विकण्याची वेळ येते की काय अशी परिस्थिती भाजपने आणून ठेवली आहे.' असे डॉ. थोरात म्हणाल्या.

### कांदा प्रश्नानावर दिंडोरीत लक्ष घाला भारती पवारांनी घेतली भुजबळांची भेट

मात्र निर्यातबंदी केली. त्यामुळे नाशिकमधील कांदा उत्पादक शेतकरी संतापले. शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली. कांदा पिकूनही सरकारच्या धोरणांमुळे शतकऱ्यांवर रडण्याची वेळ आली. विरोधकांनीदेखील हा मुद्दा लावून धरला. त्यामुळे मग केंद्रानं बांगलादेश, श्रीलंकेसह सहा देशांना ९९ हजार १५० टन कायदा निर्यातीची परवानगी दिली. शनिवारी हा निर्णय घेण्यात आला. पण ही घोषणा जुनीच असल्याचं शेतकरी नेत्यांचं म्हणणं आहे. सरकारने मात्र हा निर्णय नवीन असल्याचं सांगितले आहे. त्यामुळे संभ्रम निर्माण झाला.

**भारती पवारांची अडचण काय?**

दिंडोरीत विधानसभेच्या सहा जागा येतात. नांदगाव, कळवण, चांदवड, येवला, निफाड, दिंडोरी या सहाही मतदारसंघात कांदा पिकतो. कांदा हीच या मतदारसंघाची ओळख आहे. हेच इथलं प्रमुख पीक आहे. केंद्र सरकारच्या धोरणांमुळे दिंडोरी लोकसभा मतदारसंघात रोष आहे. शेतकऱ्यांचं कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालं आहे. याचा फटका भारती पवारांना बसू शकतो. तसं झाल्यास पवारांची निवडणुकीत खूप मोठी अडचण होईल. भारती पवारांविरोधात शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून भास्कर भगरे मैदानात आहेत. प्रत्येक भाषणात ते कांदा प्रश्नाचा उल्लेख करतात. त्यांना चांगला प्रतिसादही मिळतो. त्यामुळे भारती पवारांची धाकधूक वाढली आहे.

**पवारांच्या मागे भुजबळांचं बळ?**

केंद्र सरकारच्या धोरणाबद्दल शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. स्थानिक खासदार भारती पवार केंद्रात मंत्री असूनही त्यांना हा प्रश्न सोडवता न आल्यानं शेतकऱ्यांचा रोष जास्त आहे. त्याच पार्श्वभूमीवर भारती पवारांनी आज भुजबळांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. नाशिकचे पालकमंत्री राहिलेल्या भुजबळांचं जिल्ह्यावर चांगलं वर्चस्व आहे. ते राज्यात मंत्री आहेत. वरिष्ठ नेते आहेत. त्यामुळे त्यांनी या प्रकरणात लक्ष घातल्यास शेतकऱ्यांचा रोष कमी होईल अशी आशा पवार यांना आहे.

# केडगावला नीलेश लंके यांची प्रचारफेरी ; फटाक्यांच्या आताषबाजीत स्वागत

**केडगाव : प्रतिनिधी**

**नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आ. नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ केडगाव येथे प्रचारफेरी संपन्न झाली.यामध्ये माजी महापौर भगवान फुलसौंदर व अभिषेक कळमकर, बाळासाहेब बोराटे संजय गारुडकर,आदींसह मोठ्या संख्नेने महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते**



ठिकठिकाणी फटाकाच्या आतषबाजी स्वागत करण्यात आले, तुतारी वाजविण्यात आली झेंडा चौकातून निघालेली ही प्रचार फेरी केडगाव,भूषणनगर शाहूनगर या भागात फिरली व मत देऊन विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले.









# मळगंगा देवी यात्रा व्यवस्था समितीच्या बैठकीस अधिकाऱ्यांची उपस्थिती

## सर्वतोपरी सहकार्य करण्याची अधिकाऱ्यांची भूमिका



**निघोज : प्रतिनिधी**

**राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची मुख्य यात्रा दि.१ मे पासून सुरू होत असून यात्रा व्यवस्था समितीच्या बैठकीस तालुक्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून यात्रेसाठी भावीक, ग्रामस्थ यांची गैरसोय न होता सर्वतोपरी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचे सर्व विभाग कार्यरत राहून कार्यक्षमपणे सेवा देणार असल्याची ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली आहे.**

यामध्ये महसूल विभाग, विज वितरण विभाग, एस टी आगार पारनेर, पाटबंधारे विभाग, आरोग्य विभाग आदी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून उपस्थितांच्या सुचनांची अंमलबजावणी करण्याची ग्वाही दिली आहे. यामध्ये विज वितरण विभागाचे पारनेरचे अभियंता हातोळकर यांनी दि.१ मे ते दि.६ मे पर्यंत निघोज आणी परिसरातील सर्व विद्युत जनित्र अतिषय कार्यक्षमपणे २४ तास सुरू राहणार असून तसेच जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात सुद्धा कोनत्याही प्रकारे विद्युत खंडीत न होता सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे. पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी जगप्रसिद्ध रांजणखळगे व परिसरात सोमवार दि.२९ रोजी पाणी सोडले असून यात्रेतील लाखो भावीकांची संख्या विचारात घेता कोनत्याही प्रकारची पाण्याची टंचाई निर्माण होणार होणार नाही यासाठी निघोज परिसरासाठी अत्यावश्यक अधिकारी व कर्मचारी २४ तास उपलब्ध राहणार असल्याची ग्वाही दिली.

आरोग्य विभागाच्या वतीने भाविक व ग्रामस्थ यांना स्वच्छ व निरोगी पाण्याचा पुरवठा करण्यासाठी आरोग्य विभागाने काळजी घेतली असून यासाठी पाण्याचे साठे व जलसिंचन योजना याची दखल आरोग्य विभागाने घेतली आहे. तसेच जगप्रसिद्ध रांजणखळगे व निघोज परिसरात आरोग्य कॅम्प साठी पुरेसे डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी उपलब्ध असून २४ तास आरोग्य सेवा रुग्णवाहिका सहीत उपलब्ध असल्याची माहिती दिली.

परिवहन विभागाच्या वतीने पारनेर एस टी आगार व्यवस्थापक यांनी कुंड व निघोज यात्रेसाठी आळेफाटा, शिरुर, पारनेर या ठिकाणावरुन यात्रा स्पेशल जादा एस टी बसेस दि.१ मे पासून उपलब्ध होणार असून कुंड यात्रेसाठी निघोज ते कुंड अशा चार किलोमीटर अंतरासाठी यात्रेकरुंना गुरुवार दि.२ मे ते शुक्रवार दि.३ मे या दोन दिवशी पाच एस टी बस उपलब्ध होणार असून यासाठी आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठान चौक म्हणजेच पाण्याची जूनी टाकी कोष्टी गल्ली शेवाळे मैदान या ठिकाणी एस टी यात्रा आगार व्यवस्था होणार आहे. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष शांताराम लंके, सचिव शांताराम कळसकर, विश्वस्त व मळगंगा कंट्रक्शनचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ, विश्वस्त व डी बी लाळगे कंट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे, विश्वस्त रमेश ढवळे, विश्वस्त बबनराव ससाणे, उपसरपंच माऊली वरखडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, माजी उपसरपंच रामदास रसाळ, ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ, निघोज सोसायटीचे उपाध्यक्ष शांताराम लाळगे, संचालक संतोष लामखडे, संचालक अनिल लामखडे, माजी ग्रामपंचायत सदस्य दिलीप ढवण, पंढरीनाथ लंके, ज्ञानेश्वर भालेकर,गुलाब काळे, भास्कर वरखडे, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग, ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे, उपव्यवस्थापक रोहन उनवणे आदी तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी या सर्व अधिकाऱ्यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने ट्रस्टचे उपाध्यक्ष शांताराम लंके, सचिव शांताराम कळसकर, विश्वस्त अमृताशेठ रसाळ, विश्वस्त दत्तात्रय लाळगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असतो यासाठी प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भावीक व ग्रामस्थ यांच्या व्यवस्थेचे नियोजन करीत असतात यावेळी सुद्धा पाटबंधारे विभागाने जगप्रसिद्ध रांजणखळगे तसेच परिसरातील जलसिंचन बंधाऱ्यांना पाणी सोडून पाण्याची टंचाई दूर केली आहे.**

**अमृताशेठ रसाळ**
विश्वस्त मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट

**मळगंगा देवीच्या यात्रेसाठी सर्वच विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या प्रमाणात सहकार्य करण्याची भूमिका घेत असतात विशेष करुन विज वितरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी सतर्क असून तसेच एस टी आगार बससेवा पारनेर तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी कार्यक्षमतेने काम करीत असतात.**

**दत्तात्रय लाळगे**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समानतेची शिकवण दिली

■ सुजित झावरे पाटील यांचे प्रतिपादन ■ पोखरी येथे संयुक्त जयंती उत्सव सोहळा संपन्न

**पोखरी : प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला संविधान दिले आहे. संविधानातून आपल्याला सर्वांना समानतेचा अधिकार त्यांनी दिला जातीभेद विसरून मानव जातीसाठी काम करण्याची प्रेरणा डॉ. आंबेडकर यांच्या विचारातून मिळते. पोखरी येथे संयुक्त जयंती सोहळ्याचे आयोजन करून महापुरुषांचे विचार सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असे मत अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील यांनी पोखरी येथे आयोजित महापुरुषांच्या संयुक्त जयंती सोहळ्यामध्ये व्यक्त केले.**

ज्येष्ठ नेते अहमदनगर जिल्हा परिषद बांधकाम समितीचे माजी सभापती काशिनाथ दाते सर यांनी बाबासाहेबांचे विचार आपण सर्वांनी अंगीकारले पाहिजेल देशाला संविधान देत त्यांनी महान कार्य केले आहे. असे सांगितले.

पोखरी या ठिकाणी संयुक्त जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महापुरुषांच्या विचारांना व प्रतिमांना अभिवादन करण्यात आले गावातून भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीमध्ये महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्वसामान्य पर्यंत पोहोचविण्यासाठी अभिवादन पर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांचे विचार समजावून सांगितले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील, हे होते तसेच प्रमुख उपस्थितांमध्ये ज्येष्ठ नेते जिल्हा परिषदेचे बांधकाम समितीचे माजी सभापती काशिनाथ दाते सर, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण समितीच्या मा. सभापती मीराताई शेटे, पारनेर बाजार समितीचे माजी सभापती अरुणराव ठाणगे, पारनेर भाजपा अध्यक्ष राहुल पाटील शिंदे, युवा नेते अमोल साळवे, सतीश पाटील पवार, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, माजी उपसरपंच परशराम शेलार, अण्णासाहेब पवार, ज्ञानदेव पवार, दत्तात्रय शिंदे, आदर्श ग्रामपंचायत सदस्य अशोक खैरे, युवा नेते संतोष शेलार, किरण कोकाटे, वडनेर हवेली सरपंच लहू भालेकर, ऍड. बाबासाहेब खिलारी ज्येष्ठ नेते निजामभाई पटेल, वासुंदे ग्रामपंचायत सदस्य विलासराव साठे सर, खादी ग्राम उद्योग संचालक अण्णासाहेब खैरे, नारायण खैरे, विष्णू खैरे, पोपट कसबे, अमिन पटेल, आदित्य खैरे, सचिन कसबे, प्रशांत कसबे, संतोष खैरे, अन्सार पटेल, अनिल कसबे, हरिचंद्र कसबे, अमोल कसबे, ऋतिक कसबे, अशोक खैरे, शिवम पवार, सागर पवार, तुषार पवार, पंकज खैरे, प्रवीण कांबळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. तसेच पोखरी कामटवाडी वारणवाडी म्हसोबा झाप पवळदरा या भागातूनही ग्रामस्थ कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोखरी गावचे आदर्श ग्रामपंचायत सदस्य अशोक खैरे यांनी केले.




### शेलार कुटुंबीयांचे सामाजिक योगदान

**पोखरी येथे दरवर्षी होणाऱ्या संयुक्त जयंती उत्सव सोहळ्यानिमित्ताने शेलार कुटुंबीय हे सामाजिक दायित्व म्हणून नेहमी अन्नदान करत असतात. कै. कौसाबाई महादू शेलार व कै. तुळशीराम महादू शेलार यांच्या स्मरणार्थ मा. उपसरपंच परसराम शेलार व युवा नेते संतोष शेलार यांनी संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्त उपस्थितांना अन्नदान दिले. ही सामाजिक भावना जपण्याचे काम शेलार कुटुंबीय अनेक दिवसापासून करत आहे.**

**बाबासाहेबांनी आपल्याला समान अधिकार दिला. सर्वांना मतदानाचा हक्क संविधानामुळे मिळाला आहे. सध्या देशात निवडणुका सुरू आहेत सर्वांनी मतदानाचा अधिकार हा बजावणे गरजेचे आहे. योग्य व्यक्तीला मतदान करून आपण आपला अधिकार दाखवून दिला पाहिजे.**

**मीराताई शेटे**
जि.प.माजी सभापती

# वासुंद्यात घुमला भिर्र्र्र्र्र्रचा नाद !

## सुजित झावरे पाटील यांच्याहस्ते बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन



**वासुंदे : प्रतिनिधी**

**बैल हा शेतकऱ्याचा राजा असून शेतकऱ्याच्या सुखात दुःखात शेतकऱ्या सोबत असणाऱ्या बैलावर कष्टकरी शेतकरी खऱ्या अर्थाने प्रेम करत असतो बैलगाडा शर्यतीच्या दरम्यान आपला राजा घाटात डौलाने पळताना पाहून शेतकऱ्याला जो आनंद होतो तो शब्दात व्यक्त न करण्यासारखा असतो. असे मत वासुंदे येथे आयोजित बैलगाडा शर्यती दरम्यान सुजित झावरे पाटील व्यक्त केले.**

पारनेर तालुक्यातील वासुंदे येथे बिरोबा यात्रा उत्सवा निमित्ताने सुजीत झावरे पाटील मित्र मंडळ व देवकृपा प्रतिष्ठानच्या वतीने भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या शर्यतीचे उद्घाटन पारनेर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. बैलगाडा शर्यतीसाठी जुन्नर, आंबेगाव, मंचर, शिरूर, राहुरी, संगमनेर, पारनेर, नगर या भागातून १५० पेक्षा जास्त मोठ्या प्रमाणात बैलगाडा स्पर्धक उपस्थित होते. या ठिकाणी झालेल्या शर्यती या लक्षवेधी ठरल्या असून स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने बैलगाडा शौकीन उपस्थित होते.

या बैलगाडा शर्यतीचा उद्घाटन प्रसंगी अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, प्रवरा साखर कारखाना संचालक डॉ. दिनकर गायकवाड, प्रवरा बँकेचे माजी चेअरमन अशोकराव मेसे, प्रवरा बाजार समितीचे संचालक मकरंद गुने, शरद सोनवणे, प्रगतशील शेतकरी रंगनाथ सैद, उपसरपंच शंकर बर्वे, गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा. ठ. झावरे, रणजीत पाटील माजी उपसरपंच लहानु झावरे वासुंदे सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे, ज्येष्ठ नेते निजाम पटेल, मा. चेअरमन दिलीप पाटोळे, व्हा चेअरमन बाळासाहेब झावरे, बाळासाहेब पाटील, गुरुदत्त पतसंस्थेचे संचालक स्वप्निल झावरे, बापूसाहेब गायखे, अशोक चेमटे सर, भाऊसाहेब हिंगडे सर ,प्रसिद्ध बैलगाडा मालक बाळशिराम पायमोडे, उद्योजक विठ्ठल झावरे, संग्राम झावरे ,सचिन सैद, कैलास सैद, तुकाराम झावरे, इंजि. प्रसाद झावरे, नामा दाते अशोक भालेकर, इंजि. निकील दाते ,उत्तम तळेकर, सोसायटी संचालक लक्ष्मण झावरे, अंकुश बर्वे, गणेश शिरतार, विशाल तळेकर, सतीश हिंगडे ,संभाजी बर्वे, पोपट हिंगडे, दत्तात्रय गांगड आदी यावेळी उपस्थित होते.

दरम्यान या बैलगाडा शर्यतीसाठी बक्षिसे देण्यात आली. दुपारी २ च्या दरम्यान बैलगाडा शर्यतीच्या घाटामध्ये ५ हजारापेक्षा जास्त बैलगाडा प्रेक्षक उपस्थित होते.

# महिला बचत गटांसाठी विखे परिवाराचे योगदान

**निघोज : प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील महिला बचत गट सक्षम होण्यासाठी तसेच महिला भगिनी स्वयंपूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील व धनश्रीताई विखे पाटील यांचे फार मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन निघोज ग्रामपंचायतच्या कार्यक्षम सदस्या शबनूर इनामदार यांनी व्यक्त केले आहे.**

राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रेतील भावीकांसाठी तेजस्विनी महिला बचत गट व मळगंगा महिला बचत गटाने मंदीरासमोरील आवारात लस्सी, थंड पाणी तसेच थंडपेय तसेच नाष्टा व उपवासाच्या पदार्थांचे स्टॉल सुरू केले असून इनामदार व त्यांच्या सहकारी महिला भगीनींनी या स्टॉलला भेट दिली यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी सोनाली वराळ, ज्योत्स्ना लोढा, शैला खराडे, निशा लंके, शारदा ऊर्फ गया तुपे, पुष्पा भोसले, संध्या गायखे, सारिका गायखे, रुपाली गायखे, तेजस्विनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सविता गायखे, मळगंगा महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनीताई पवार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




ग्रामपंचायत सदस्या इनामदार यावेळी म्हणाल्या नामदार राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ सुजय विखे पाटील तसेच जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, धनश्रीताई विखे पाटील यांनी जिल्ह्यातील महिला बचत गट सक्षम होण्यासाठी गेली पाच वर्षात मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. शासनाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी योजनांची सर्वाधिक अंमलबजावणी अहिल्यानगर जिल्ह्यात झाली आहे. तेजस्विनी महिला बचत गट तसेच मळगंगा महिला बचत गट माध्यमातून राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रेसाठी हे स्टॉल सुरू करुण भावीकांना थंड पेय तसेच उपवासाचे पदार्थ व नाष्टा स्वस्त दरात उपलब्ध होणार आहे. हे दोन्ही महिला बचत गट तसेच निघोज व परिसरातील शेकडो महिला बचत गट अतिशय सक्षम व कार्यक्षमपणे सेवाभाव करीत असून त्यांना विखे पाटील कुटुंबीयाने मोठा आधार व पाठबळ दिले असल्याने निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटातील हजारो महिला स्वयंपुर्ण झाल्या आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मळगंगा महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनीताई पवार यांनी केले शेवटी तेजस्विनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सविता गायखे यांनी आभार मानले.

# देशाला एका कणखर नेतृत्त्वाची गरज

## शिवाजीराव कर्डिले यांचे मत

**नगर : प्रतिनिधी**

**देशाला एका कणखर नेतृत्वाची गरज आहे आणि नरेंद्र मोदी हेच त्याला पर्याय आहेत. यामुळे नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारा विजयी करा असे आवाहन माजी मंत्री तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले यांनी केले आहे. ते नगर तालूक्यातील महायुतीच्या सभेत बोलत होते. यावेळी त्यांनी महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कामाबद्दल मतदारांना माहिती दिली.**

तालूक्यातील येथे महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या मेळाव्याचे इमामपूर येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाजार समिती संचालक मधुकर मगर दत्ता तापकीरे धर्मनाथ आव्हाड ख वि संघ व्हा चेअरमन डॉ मिनीनाथ दुसुंगे संचालक डॉ राजेंद्र ससे आदेश भगत सुरेश वारूळे उपस्थित होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने देशात मागील १० वर्षात विविध विकास कामे करून देशाला प्रगतीच्या पथावर आणले आहे. शेतकरी, कष्टकरी, तरूण, महिला आणि विद्यार्थांसाठी विविध योजना राबविल्या आहेत. यामुळे देशातील प्रत्येक घटकाचा विकास झाला. यामुळे येणाऱ्या काळात पंतप्रधान मोदींच्या हातात देश अधीक बळकट आणि सुरक्षित होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महायुतीचा उमेदवार हा प्रतिमोदी असून तुमचे मत हे सरळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळणार आहे. म्हणून महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी काम करा असे आवाहन त्यांनी केली.खा.सुजय विखे पाटील यांनी आपल्या खासदारीच्या काळात केलेल्या कामांची माहिती त्यांनी मतदारांना दिली. येणाऱ्या काळात अहिल्यानगच्या विकासासाठी एक तरूण आणि महत्वाकांक्षी खासदार आपल्याला निवडून द्यायचा आहे असेही ते म्हणाले.

आपल्या भाषणात खा. सुजय विखे म्हणाले की, विखे कुटुंबाने विकास हेच ध्येय ठेऊन नगरसाठी काम केले आहे. माझ्या पाच वर्षाच्या छोटाशा काळात मला जितके शक्य झाले, तितकी विकास कामे केली आहेत आणि ती कामे आज नगर मध्ये दिसतात. येणाऱ्या काळातही पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली नगर जिल्ह्यात जास्तीत जास्त निधी मिळवून विका कामे केली जातील. त्यात पायाभूत सेवा सुविधांपासून अत्याधुनिक सेवांचा समावेश आहे. नगरमधील विविध प्रश्न येणाऱ्या काळात संसदेत मांडून त्याचे समाधान केले जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.

# दिलीप खेडकर यांना विक्रमी मताधिक्य देऊ

## सुपा येथील प्रचार बैठकीत ओबीसी नेत्यांची ग्वाही



**सुपा : प्रतिनिधी**

**वंचित बहुजन आघाडीचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार ओबीसी नेते दिलीप खेडकर यांनी सुपा येथे तालुक्यातील प्रमुख ओबीसी, दलित, बहुजन पदाधिकारी यांची भेट घेत पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील राजकिय, सामाजिक परिस्थिती बाबत चर्चा केली. आणि लोकसभेच्या माध्यमातुन ओबीसी, बहुजन, वंचित, उपेक्षित प्रश्न सोडवण्यात येईल अशी ग्वाही दिली.**

यावेळी पारनेर तालुक्यातील ओबीसी बहुजन प्रतिनिधी यांनी दिलीप खेडकर यांचे स्वागत केले. दिलीप खेडकर हे ओबीसी असल्याने त्यांना पारनेर मधुन विक्रमी मताधिक्य देऊ अशी ग्वाही सुपा येथील प्रचार बैठकीत पारनेर नगर मतदारसंघाचे ओबीसी नेते प्रसाद खामकर यांनी दिली.

यावेळी पारनेर तालुका खादीग्राम उद्योगचे उपाध्यक्ष राजेंद्र करंदीकर, समता परिषद नगर जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, धनगर समाजाचे युवा नेते गजानन कुलाळ, वाघुंडे गावचे माजी सरपंच संजय रासकर, ग्रामपंचायत सदस्य अनिल गाडीलकर, रायतळे गावचे माजी सरपंच बापू साबळे, कुंभार महासंघाचे अनंत श्रीमंदीलकर, गोपाळ समाजाचे प्रतिनिधी रमेश गव्हाणे, रुईछत्रपती गावचे ओबीसी प्रतिनिधी दत्तात्रय भुजबळ, शरद वाघमोडे, महेश शिंदे, किरण नगरे, तात्या नगरे आदी ओबीसी बहुजन नेते यावेळी उपस्थित होते.

# पाणीटंचाईच्या झळा; जिल्ह्यात २३७ टँकर सुरु

**नगर : प्रतिनिधी**

**नगर जिल्ह्यात दिवसेंदिवस टंचाईच्या झळा तीव्र होत आहे. त्यामुळे टँकरची संख्या ही रोजच वाढत आहे. सध्या जिल्ह्यात २२७ गावे, १२२२ वाडी-वस्तीवरील ४ लाख ७३ हजार लोकांना २३७ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. त्यात सर्वाधिक ८८ टँकर पाथर्डी तालुक्यात सुरू आहे.**

दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत जिल्हा प्रशासनाकडून टंचाई आराखडा तयार केला जातो. यंदा ८४ कोटी ४५ लाख रुपयांच्या टंचाई आराखड्यास जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिलेली आहे. त्यात पाण्याच्या टँकरच्या खर्चासाठी ८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



पुढील मे महिन्यात आणखी उष्णता वाढण्याची शक्यता असल्याने टँकरच्या आकडाही झपाट्याने वाढण्याची शक्यता गृहीत धरून प्रशासनाला नियोजन करावे लागणार आहे. आजमितीला संगमनेर तालुक्यात २१, अकोले ४, नेवासे २, नगर १५, पारनेर २४, पाथर्डी ८८, शेवगाव ९, कर्जत ४३, जामखेड १८, श्रीगोंदे १३ अशी एकूण २३७ टँकर सुरू आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com